**<u>डब्ल्युसीए क्र. ०३/२०१९</u>** **<u>पान क्र. ०८</u>** **<u>नि. क्र. यु—२४</u>**

**<u>नि.क्र सी—२१ वरील आदेशाप्रमाणे उलटतपास शपथेवर सुरू</u>**

**<u>उलटतपास गैरअर्जदार क्र.१ यांच्या तर्फे ॲड. पि.एम.गिरडकर यांचे मार्फत :—</u>**

१६. हे म्हणने खरे आहे की मयत माझा मुलगा हा नागपूर येथे राहत होता. हे म्हणने खरे आहे की मी नान्होरी ता.ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर येथे राहतो. मला घटनेबदल काही माहित नाही, मी त्याबाबत नंतर ऐकले. हे म्हणने खरे आहे की माझा मुलगा ट्रॅक्टरवर ड्रॉयव्हर होता. हे म्हणने खरे नाही की सदरचे ट्रॅक्टर गैरअर्जदार क्र.१ कंपणी मध्ये नव्हते. हे म्हणने खरे नाही की माझा मुलगा गैरअर्जदार कंपणी मध्ये काम करीत नव्हता. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदार क्र.१ माझे मुलाला कोणताही पगार देत नव्हता.

१७. हे म्हणने खरे नाही की माझा मुलगा दारू पिऊन ट्रॅक्टरवरून स्वत: पडला व ट्रॅक्टरच्या चाकाखाली येवून मरण पावला. हे मला माहित नाही की नागपूर येथे माझे मुलाविरूध्द निष्काळजीपणे गाडी चालविण्याबाबत गुन्हा दाखल झाला होता. हे म्हणने खरे नाही की माझे मुलाच्या अपघातामध्ये गैरअर्जदार क्र.१ ची कोणतीही चुक नाही. हे म्हणने खरे नाही की अपघाताचे वेळी तो गैरअर्जदार कंपणीमध्ये काम करीत नव्हता. हे म्हणने खरे नाही की मी गैरअर्जदार क्र.१ विरूध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास संपला.</u>

<u>फेरतपास</u> <u>काही नाही.</u>

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा—

(एम. ए. हुसेन)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०५.०८.२०२६.